K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
ASSESSMENT II - 2023-24

GRADE: VII | MARKS: 100
SUBJECT: MARATHI | TIME: 3HRS

**विभाग -अ (गद्य-पद्य)**

**प्र.१.अ) खालील पठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** **(७)**

सहलीच्या दिवशी आम्ही पहाटेच निघालो. सोलापूर- बार्शी मार्गावर बाबीस किलोमीटर अंतरावर असलेल्या नान्नज गावाजवळ 'माळढोक अभयारण्य आहे. ठरलेल्या वेळी आम्ही तिथे पोहोचलो. अभयारण्यातून फिरत असताना सर सांगत होते, की 'भारतातून नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या माळढोक या अत्यंत देखण्या पक्ष्याला वाचवण्यासाठी वनविभागानं हे अभयारण्य घोषित केलेल आहे. माळढोक पक्षी शेतकऱ्याचा मित्र आहे, कारण शेतातील किड्यांवर तो गुजराण करतो. हा पक्षी वर्षातून एकदाच अंडी घालत असल्याने त्यांची संख्या कमी आहे. शिवाय इतर प्राण्यांनी माळढोक पक्ष्यांची अंडी तुडवली, तर संख्या आणखीनच कमी होते.दादा, आम्ही हा माळढोक पक्षी अगदी जवळून व निरखून बघितला.

अ. एका शब्दात उत्तरे लिहा. (३)

१) अभयारण्य या गावाजवळ आहे

२) भारतातून नष्ट होणारा पक्षी

३) माळढोक पक्षी शेतकऱ्याचा मित्र आहे कारण-

आ.एका वाक्यात उत्तरे लिहा. (२)

१) माळढोक अभयारण्य कोठे आहे ?

२) वनविभागाने अभयारण्य का घोषित केले?

इ. माळढोक पक्ष्याची संख्या कमी होण्याची कारणे (२)

१ ____________________

२ ____________________

**प्र.१.ब खालील पठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** **(७)**

गोपाळने धावतच जाऊन वाटेलगतच्या शेतातील नदीवरून सुरू असलेला पाण्याने भरलेला रबरी पाइप सर्व शक्तीनिशी ओढायला सुरुवात केली. साधारणपणे अडीच-तीन इंच परीघ असलेला तो लांबच लांब पाइप गोपाळ आगीच्या दिशेने ओढत आणत होता."ह्ये आग एकट्याकडून इझणार नाईच. हे मलेही माईत हाये, पन म्हनून काय परेतनंच करावं न्हाई का काय? सर, असं जंगलंच आम्हां आदिवासींचे पोशिंदे हायेत. आनं मायबापाले कोनी असं आगीच्या मुखी सोडून जातेत काय ?" बाजूला उभा असलेला गावातील एक गुराखी सरांना म्हणाला.

गोपाळ गुराख्याकडे पाहून म्हणाला, "माणसं असो का जनावरं त्यांना वाचवलंच पाहिजे ना ! सर्वांनी मिळून आग विझवलीच पाहिजे." हे पाहून सर्व विदयार्थी व शिक्षक एकापाठोपाठ एक गोपाळच्या मदतीला धावले.
एवढ्यात दुसरी एक गाडी गडावरून खाली उतरली. त्या गाडीतील पन्नाशीचे एक गृहस्थ खाली उतरले. त्यांनी सर्व प्रकार क्षणात न्याहाळला आणि त्यांनी मोबाईल कानाला लावला. मोबाईलवरील संभाषण संपताच ते गोपाळच्या मदतीलाही गेले. आता तो पाइप सहजगत्या चौफेर पाणी फेकू लागला.

अ.आकृती पूर्ण करा

१) गोपाळच्या मदतीला धावणारे १) [ ] २) [ ] (१)

आ.एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) गोपाळने आग भिजवण्यासाठी काय केले?

२) गोपाळ गुराख्यांना पाहून काय म्हणाला?

इ. रिकाम्या जागा भरा (२)

१) जंगलच आम्हा ________पोशिंदे आहेत.

२) तो पाईप सहजगत्या________ पाणी फेकू लागला.

ई.एका शब्दात उत्तरे लिहा (२)

१) आदिवासींचे पोशिंदे______

२) दुसऱ्या गाडीतील गृहस्थाचे वय_______

**प्र.२.अ) खालीलपैकी पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा.** **(७)**

टप् टप् पडती अंगावरती प्राजक्ताची फुले
भिर् भिर् भिर् भिर् त्या तालावर गाणे अमुचे जुळे!

कुरणावरती, झाडांखाली ऊनसावली विणते जाळी
येतो वारा पाहा भरारा, गवत खुशीने डुले!

दूरदूर हे सूर वाहती, उन्हात पिवळ्या पाहा नाहती
हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले!

गाणे अमुचे झुळझुळ वारा, गाणे अमुचे लुकलुक तारा
पाऊस, वारा, मोरपिसारा या गाण्यातुन फुले!

फुलांसारखे सर्व फुला रे, सुरात मिसळुनि सूर, चला रे
गाणे गाती तेच शहाणे, बाकी सारे खुळे!

**अ) एका शब्दात उत्तरे लिहा.** (२)

१) आवाज १) प्राजक्तांच्या फुलांचा [ ]

२) वाऱ्याचा [ ]

२) १) गाणे गाणारे [ ]

२) गाणे न गाणारे [ ]

आ.खालील शब्दांचे अर्थ कवितेतून शोधून लिहा. (२)

१) झोका - २) तृण -

इ.फुलांसारखे सर्व फुला रे,सुरात सूर मिसळून चला रे
गाणे गाती तेच शहाणे बाकी सारे खुळे
(वरील कवितेच्या ओळींचा अर्थ स्पष्ट करा.) (२)

ई.१) गवत खुशीने का डुलते? एका वाक्यात उत्तर लिहा. (१)

**प्र.२.ब) खालीलपैकी पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा.** (७)

गहू शाळवाचं मोती काळ्या रानात सांडलं,
आणि माझ्या अंगणात लख्ख चांदणं पडलं ॥१॥
काळ्याशार मातीतुनी मोती-पवळ्याची रास,
अंगणात माझ्या डुले रानमेव्याची मिजास ||२||
दिला- घेतला वाढतो रानातला रानमेवा,
तुम्ही आम्ही सारेजण गुण्यागोविंदानं खावा ||३||
जीव दमतो, शिणतो. घास भरवते माय,
घरामंदी घरट्यात जशी दुधातली साय ||४||
अंगणात आज माझ्या दाणं टिपती पाखरं,
दूर उडुनिया जाता आसू येती गालावर ॥५॥

अ) एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१) मोती पवळ्याची रास येथून उगवते -__________

२) दिल्या घेतल्याने वाढणारा_________

आ.) एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) कवी गुण्यागोविंदाने रानमेवा खायला का सांगत आहे?

२) कवीच्या अंगणात पाखरे का येतात?

इ. कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधून लिहा (१)

१) माय______ २) सांडल_______

ई. खालील कवितेच्या ओळींचा अर्थ लिहा. (२)

दिला घेतला वाढतो रानातला रानमेवा
तुम्ही आम्ही सारे जण गुण्या गोविंदाने खावा

**प्र.३.अ) खालील अपठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे शोधून लिहा.** (७)

विचाराने एखादी गोष्ट समजावून दिली की ती माणसाला पटते. समजावून देण्याऐवजी भय दाखवून, मार देण्याची भीती दाखवून पटवण्याचा प्रयत्न केला, तर भीती निर्माण होते; भीती न दाखवावी तर माणूस स्वच्छंदी बनतो. सिंहाचे वळ त्याच्या दातांत आहे. हत्तीचे सामर्थ्यं सोंडेत आहे. गाई-बैलांची शक्ती त्यांच्या शिंगांत आहे, तसे मानवाचे सर्वस्व कोणते? तर माणसाची शक्ती, ती त्याच्या बुद्धीत आहे.निर्बुद्धपणाने वागून तो आपले सामर्थ्य न ओळखील तर आपली शक्ती तो गमावून । बसेल. माणसाच्या या बुद्धिसामर्थ्यालां नीट मार्गावर ठेवण्यासाठी जो प्रयत्न केला जातो तो सत्याग्रह किंवा सत्यदर्शन ।

अ) एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) माणसाची सर्व शक्ती कशात आहे?

२) सत्याग्रह म्हणजे काय?

आ. भीती न दाखवावी तर माणूस ____ बनतो(रिकाम्या जागा भरा.) (१)

इ.एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१) भीती दाखवून पटवण्याचा प्रयत्न केला, तर _____

२) माणूस आपली शक्ती कसा गमावतो______

ई.खालील शब्दांचे समानार्थी शब्द उताऱ्यातून शोधून लिहा. (२)

१) शक्ती - २) भय-

**प्र.३.ब) खालील अपठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे शोधून लिहा.** **(७)**

हासरा नाचरा, जरासा लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला
तांबुस कोमल पाऊल टाकीत भिजल्या मातीत श्रावण आला
मेघांत लावीत सोनेरी निशाणे आकाशवाटेने श्रावण आला
लपत छपत, हिरव्या रानात, केशर शिंपीत श्रावण आला
इंद्रधनुष्याच्या बांधित कमानी संध्येच्या गगनी श्रावण आला
लपे ढगामागे धावे माळावर, असा खेळकर श्रावण आला
सृष्टीत सुखाची करीत पेरणी आनंदाचा धनी श्रावण आला

कुसुमाग्रज

अ) एका शब्दात उत्तरे लिहा. (४)

१) श्रावण येथे लपतो__

२) श्रावण कशाची पेरणी करतो___

३) पाऊले अशी आहेत ______

४) श्रावण शिंपतो______

आ.कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधा (२)

१) नाचरा_____ २) लपत _______

इ.कवितेतील समानार्थाचे शब्द शोधून लिहा (१)

१) ढग-

**प्र.३.क) खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.** **(१२)**

१) तुम्ही पाहिलेल्या धान्याच्या शेताचे वर्णन करा.

२) गोपाळचा कोणता गुण तुम्हाला आवडला का ते लिहा.

३) तुमचा आवडता पक्षी कोणता का ते लिहा.

४) शहरातून पक्षांची संख्या कमी का झाली आहे असे तुम्हाला वाटते?

५) तुमच्या घरातील एखादी व्यक्ती आजारी पडल्यास तिला मदत म्हणून तुम्ही काय करता.

## विभाग - ब (व्याकरण)

**प्र.४) सुचनेनुसार कृती करा.**

**१) खालील अव्ययांचा वापर करून वाक्यात उपयोग करा** **(२)**

१) पक्ष्यांसोबत २) कारण

**२) गटात न बसणारा शब्द ओळखा** **(३)**

१) मी, सातपुते , त्याने, तिला

२) आकाश, पक्षी, डोंगर, उडणे

३) चांगला, चार-पाच लिटर, करणे, सुंदर

**३) खालील अधोरेखित शब्द कोणत्या अव्यय प्रकारातल्या आहे ते ओळखून लिहा.** (३)

१) जनतेची सेवा करा म्हणजे जनता तुम्हास निवडून देईल.

२) परमेश्वर सर्वत्र आहे.

३) काल शाळेला सुट्टी होती.

**४) खालील विरामचिन्हांची नावे ओळखून लिहा.** (२)

१) ,  २) '-----'

**५) समानार्थी लिहा** (२)

१) अरण्य -  २) सावली-

**६) विरुद्धार्थी शब्द लिहा.** (२)

१) पायथा ×  २) शहाणपणा ×

**७) वचन बदला.** (२)

१) चित्रफित-  २) पुस्तके -

**८) लिंग बदला.** (२)

१) डॉक्टर- .  २) लेखक -

**९) खालील रिकाम्या जागी कंसातील योग्य वाक्यप्रचार लिहा.** (२)

**(हतबल होणे, हेवा वाटणे, ठणठणीत असणे,)**

१) गोपाळच्या वागणुकीमुळे शिक्षक___________

२) सुलेमान चाचा रोज सकाळी फिरायला जातात त्यामुळे त्यांची तब्येत ___________

**विभाग क (लेखन विभाग)**

**प्र.५.अ.)खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा** (८)

१) पक्षी निसर्गाचा महत्त्वाचा घटक

२) मुलांसाठी मोबाईलवर बंदी आली तर...

**प्र.५.ब) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा.** (६)

१) दादास पत्र हा पाठ शिकून पक्षांविषयी झालेल्या ज्ञानाबद्दल आपल्या वडिलांना पत्र लिहा.

२) तुमच्या घरासमोरील उद्यानामध्ये खूप पावसाचे पाणी साचले आहे याची तक्रार करणारे पत्र तुमच्या परिसरातील महानगरपालिकेला लिहा.

**प्र.६.अ) खालील मुद्द्यांच्या आधारे अर्थपूर्ण कथा तयार करा व योग्य शीर्षक व तात्पर्य लिहा.** (६)

मुद्दे :लोभी माणूस - भरपूर पैसा पण लोभ सुटत नाही रात्रंदिवस पैशांचा विचार रोज देवाची - प्रार्थना "मला अजून श्रीमंत कर" देव म्हणतो ठिक आहे. वरदान - सूर्य उगवल्यापासून - सूर्यास्तापर्यंत - तू जितका धावशील तितकी जमीन तुझी खूप आनंद- सकाळी उठून धावणे. - थकणे - मरणे.

**प्र.६. ब) खालील विषयावरून ८० ते १०० शब्दात बातमी लेखन करा.** (६)

१) तुमच्या सोसायटीतील शिवजयंती कार्यक्रमाचे बातमी लेखन करा.

*****************